(२६)

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२' अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.९९/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ९ ऑगस्ट, २०१६

संदर्भ-

१) शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/स्वयंअर्थ /२०१६/१६-१७/३०१/४२६६, दिनांक १९.७.२०१६

२) शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/स्वयंअर्थ /२०१६/१६-१७/३०१/४४२५, दिनांक २५.७.२०१६

३) शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/स्वयंअर्थ /२०१६/१६-१७/३०१, दिनांक १.८.२०१६

प्रस्तावना-

१. उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन शाळा स्थापन करण्यास अथवा विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर झाले आहेत. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सोबतच्या सहपत्रामधील २६ शाळा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) सदर शासन निर्णयाच्या सोबतच्या सहपत्रामधील संबधित शाळांच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९ मधील** तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच <u>रद्दबातल</u> ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सीबीएसई मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा

परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा. ग. गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक/पुणे/लातूर/कोल्हापूर/अमरावती/ औरंगाबाद.
६. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद (प्राथमिक/माध्यमिक),नाशिक/पुणे/लातूर/ कोल्हापूर /उस्मानाबाद/वाशिम/सातारा/बुलडाणा/परभणी/धुळे/रत्नागिरी/ अहमदनगर /सिंधुदुर्ग/ यवतमाळ
७. निवडनस्ती (एसएम-२)

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १३ | वाशिम | विद्याभारती शिक्षण संस्था, सनगाव, ता.मंगरुळपीर, जि.वाशिम | विद्याभारती प्राथमिक व माध्यमिक शाळा, सिव्हील लाईन, वाशिम, जि.वाशिम | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | मराठी |
| १४ | सातारा | यशवंत शिक्षण संस्था, मायणी, ता.खटाव, जि.सातारा | ब्लॉसम इंग्लिश स्कूल, मायणी, ता.खटाव, जि.सातारा | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता ६ वी ते १२ वी | इंग्रजी |
| १५ | बुलढाणा | श्री.संत गजानन महाराज बहुउद्देशिय सेवा समिती, मलकापूर, ता.मलकापूर, जि.बुलढाणा | सरकार पब्लिक स्कूल, मलकापूर, ता.मलकापूर, जि.बुलढाणा | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता ६ वी ते १२ वी | इंग्रजी |
| १६ | पुणे | के.उद्धवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन, वडगाव(बु.पुणे | पॅरेडाईज इंग्लिश मेडियम स्कूल व ज्युनियर कॉलेज, मानाजीनगर, नऱ्हे, पुणे ४१ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| १७ | पुणे | के.उद्धवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन, वडगाव(बु.पुणे | डॉ.सुधाकरराव जाधवर प्राथमिक ते उच्च माध्यमिक विद्यालय, धनकवडी,पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| १८ | परभणी | श्री.गजानन सेवा प्रतिष्ठाण सेलू, जि.परभणी | व्हीजन इंग्लिश स्कूल, विद्यानगर, सेलू, ता.जि.परभणी | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) | इंग्रजी |
| १९ | धुळे | श्री.विलेपार्ले केळवणी मंडळ, विलेपार्ले(प), मुंबई | एस.व्ही.के.एम.स्कूल, धुळे | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली ते १० वी) | इंग्रजी |
| २० | कोल्हापूर | सुरज फौंडेशन, कुपवाड, जि.सांगली | नव कृष्णा व्हॅली स्कूल इंग्लिश मिडीयम, उत्तुर, ता.आजरा, जि.कोल्हापूर | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) | इंग्रजी |
| २१ | यवतमाळ | मातोश्री लक्ष्मीबाई बुरेवार बहुउद्देशिय शिक्षण संस्था,पहूर, ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ | पी.एम.बी. इंग्लिश मिडीयम स्कूल, गिमोणा फाटा, ता.बाभुळगाव, जि.यवताळ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी) | इंग्रजी |
| २२ | रत्नागिरी | मार्गताम्हाणे एज्युकेशन सोसायटी, मार्गताम्हाणे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी | वसंतराव भागवत माध्यमिक विद्यालय, मार्गताम्हाणे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक(इयत्ता १ ली ते ५ वी) | मराठी |
| २३ | अहमदनगर | के.हशुजी अडवाणी शैक्षणिक संस्था, जामखेड, जि.अहमदनगर | खेमानंद इंग्लिश मिडीयम स्कूल, खर्डा रोड, जामखेड, जि.अहमदनगर | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| २४ | सिंधुदुर्ग | शिरगाव पंचक्रोशी (ता.देवगड) शिक्षण प्रसारक मंडळ, मुंबई | इंग्लिश मिडीयम स्कूल, शिरगाव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली ते १० वी) | इंग्रजी |
| २५ | पुणे | अनिशा एज्युकेशन सोसायटी, लेन नं.२, प्लॉट नं.५३, कोरेगाव पार्क,पुणे-४११००१ | अनिशा ग्लोबल स्कूल, स.नं.१३/१/१, कड नगर, उंड्री,पुणे ४११०२८ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| २६ | पुणे | अनिशा एज्युकेशन सोसायटी, लेन नं.२, प्लॉट नं.५३, कोरेगाव पार्क,पुणे-४११००१ | अनिशा ग्लोबल स्कूल, स.नं.१३/१/१, कड नगर, उंड्री,पुणे ४११०२८ | नवीन शाळा | आय.बी. | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |

**कै.उध्दवराव तुळशीराम जाधवर फाऊंडेशन, पुणे संचलित डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, धनकवडी, जि.पुणे या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी, पुणे या संस्थेस हस्तांतर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः माशाह ३११९/प्र.क्र.३४७/एसएम-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १३ नोव्हेंबर, २०१९

वाचा : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक माशाह २०११/ (२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२

संदर्भ : विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे जा.क्र.शिउसं/माध्य-३०२/पुवि/शाळा हस्तांतर सुनावणी/६०५१/२०१८, दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ चे पत्र.

**प्रस्तावना :**

कै.उध्दवराव तुळशीराम जाधवर फाऊंडेशन, पुणे संचलित डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, धनकवडी, जि.पुणे या स्वयंअर्थसहाय्यित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे, निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी, पुणे या संस्थेस हस्तांतर करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

सदर शाळेचे, निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी, पुणे या संस्थेकडे हस्तांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

(१) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेची कोणत्याही कारणास्तव किमान पटसंख्येची अट शिथिल केली जाणार नाही.

(२) सदर शाळेस ज्या तत्वावर परवानगी दिली आहे, त्याच तत्वावर हस्तांतरणानंतरही कार्यरत राहील.

(३) सदर शाळा व कनिष्ठ महाविद्यालय स्वयंअर्थसहाय्यित असल्याने शाळेत कार्यरत शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील.

(४) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या/मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

(५) शासनाकडून शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेत्तर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेस बंधनकारक राहील.

(६) सदर व्यवस्थापन बदल, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांकः माशाह २०११/(२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपद्धतीनुसार अंमलात येईल.

(७) सदर शाळा स्वयंअर्थसहाय्यित शाळा असल्याने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मधील तरतूदीनुसार सदर शाळेसाठीची सध्याची जमीन, निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी, पुणे या संस्थेच्या नावे असणे किंवा या संस्थेने (३० वर्ष कालावधीतून आधीच्या संस्थेचा ३ वर्ष

कालावधी वगळता) किमान २७ वर्षासाठी नोंदणीकृत भाडेकराराने घेणे आवश्यक राहील. याबाबतची कागदपत्रे संस्थेने विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना सादर करणे आवश्यक राहील.

(८) सदरहू व्यवस्थापन बदलासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे नव्याने कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदला संदर्भातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा नवीन संस्थेद्वारा भंग झाल्यास, हस्तांतरण रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी वरील अट क्रमांक (७) ची पूर्तता झाल्यावर सर्व बाबी तपासून व वरील अटी/शर्ती व्यतिरिक्त आवश्यक अटींचा समावेश करून, शाळेचे व्यवस्थापन बदलाबाबत ४ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९१११३१६५३०५५८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.11.13 16:55:38 +05'30'

**( प्रविण मुंढे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) शिक्षण संचालक (माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे

३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे

४) अध्यक्ष/ सचिव, कै.उध्दवराव तुळशीराम जाधवर फाऊंडेशन, पुणे

५) अध्यक्ष/ सचिव, निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी, पुणे

६) निवडनस्ती ( एसएम-१).

**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे — १.**
दुरध्वनी क. ०२०-२६१२२६९६ फॅक्स क. ०२०-२६१२२२१७
संकेत स्थळ : dydepune.com ई-मेल : dydpune@gmil.com

---

जा.क्र. शिऊसं/माध्य-३०२/ शाळा नांव बदल/२०१८/3068
दिनांक : 23 MAY 2018

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

विषय : शाळेच्या नांवात बदल करणेबाबत
प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश मेडियम स्कूल व ज्यू कॉलेज,
धनकवडी, पुणे-४३.
ऐवजी
चाटे पब्लिक स्कूल अँन्ड ज्यू.कॉलेज, धनकवडी पुणे

संदर्भ : १.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र क्रमांक
जा.क्र.जिप/शिक्षण/माध्य/२०१८/३०००,दिनांक २४.४.२०१८
२.मा.अवर सचिव,शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक
क्र.एसएसएन-१०९६/७०८८/माशि-१, दिनांक ३.१२.१९९८

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यांत येते की, कै.उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन, इंद्रप्रस्थ क्रांतीनगर, वडगाव बु, पुणे-४१ या संस्थेने या दिनांक २४.३.२०१८ च्या ठरावा नुसार प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश मेडियम स्कूल व ज्यू कॉलेज, धनकवडी, पुणे-४३. ऐवजी चाटे पब्लिक स्कूल अँन्ड ज्यू.कॉलेज, धनकवडी पुणे याप्रमाणे नावांत बदल करण्याचे ठरविले आहे.

| जुने नांव | नवीन नांव |
|---|---|
| प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश मेडियम स्कूल व ज्यू कॉलेज, धनकवडी, पुणे-४३. | चाटे पब्लिक स्कूल अँन्ड ज्यू.कॉलेज, धनकवडी पुणे |

संदर्भ क्रमांक २ चे शालेय शिक्षण विभाग,मुंबई यांच्या दिनांक ३.१२.१९९८ चे परिपत्रकानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांच्या कार्यालयाचे दप्तरी नोंद घेण्यात आलेली आहे. सदर नोंद आपल्या कार्यालयाच्या दप्तरी घेण्यांत यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : माहितीस्तव कार्यवाहीसाठी रवाना
अध्यक्ष, , कै.उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन, इंद्रप्रस्थ क्रांतीनगर, वडगाव बु, पुणे-४१ या संस्थेने या दिनांक २४.३.२०१८ च्या ठरावा नुसार प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश मेडियम स्कूल व ज्यू कॉलेज, धनकवडी, पुणे-४३. ऐवजी चाटे पब्लिक स्कूल अँन्ड ज्यू.कॉलेज, धनकवडी पुणे